क्र.२/नसवि/प्रशासक/ ०४/२०२३-२०२४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २० आक्टोंबर २०२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
प्रशासक सभा क्रमांक - ०४/२०२३-२०२४
स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी *महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार* सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.२३/१०/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०१/०९/२०२३ ते दि.०७/०९/२०२३, दि.०८/०९/२०२३ ते १४/०९/२०२३, आणि दि.१५/०९/२०२३ ते दि.२१/०९/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

३. सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, मध्ये सांगली येथील जुना कुपवाड रस्ता,कलानगर,पद्माळे रोड आणि तात्यासाहेब मळा (जासूद मळा) या चार ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग कामाचे मंजूर मक्तेदार श्रीराम ड्रिलिंग कंपनी,सांगोला यांचे नावे मंजुर असून, पैकी कलानगर व पद्माळे रोड येथील रेल्वे क्रॉसिंगच्या कामास मुदतवाढ देणे व सदर दोन्ही ठिकाणी वाढीव काम चालू DSR नुसार करुन घेणेस व त्यास GST सह येणारे एकूण र.रु.७५,२१,३२४/- मात्रच्या खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१८/१०/२०२३ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ निलजी बामणी रोडवरील रस्ते हॉटमिक्स करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ सिद्धार्थ झोपडपट्टी बौद्ध वसाहत येथील रस्ते काँक्रिटी करणे व चेंबर करणे (४) मिरज वॉर्ड क्र.२० अ दिपक कडाळे यांच्या घरामागील रस्ता काँक्रिटीकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.६४,९९,७२६/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचेकडून त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.५३,२४,९८३/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१०/२०२३ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ खतिब हॉल समोरील इनामदार झोपडपट्टी येथे रस्ते काँक्रिटीकरण करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ त्रिभुवन सोसायटी येथील रस्ते हॉटमिक्स करणे (३) मिरज वॉर्ड क्र.२० अ ख्वॉजा वसाहत १०० फुटी ते रत्नागिरी हायवे हॉटमिक्स बी बी एम करणे अंदाजपत्रकीय र.रु.९४,९९,४७२/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचेकडून त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.७५,०९,३१५/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१०/२०२३ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४ दिनांक :- २३/१०/२०२३ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०४ दि.२३/१०/२०२३ रोजी महापालिकेच्या पद्मभूषण डॉ.वसंतराव दादा पाटील सभागृह, सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.संजय ओहोळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज
३.	श्री.राहुल रोकडे – उपायुक्त,सांगली	४.	श्री.वैभव साबळे –उपायुक्त, कर
५.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता	६.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक
७.	श्री.सुशिलकुमार केंबळे – लेखाधिकारी	८.	श्री.वैभव पाटील - वैद्यकिय आरोग्याधिकारी
९.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	१०.	श्री.अशोक माणकापुरे- प्रशासकीय अधिकारी
११.	श्री.नितीन शिंदे- मालमत्ता व्यवस्थापक/कर निर्धारक,संकलक	१२.	श्री.तेजस शहा - ज्युनि.इंजि.वर्कशॉप,सांगली/जलवि
१३.	श्री.सचिन सागावकर – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२	१४.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
१५.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.	१६.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष
१७.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता	१८.	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
१९.	श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क / विधी अधिकारी	२०.	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
२१.	श्री.सुनिल पाटील - विशेष कार्यकारी अधिकारी,पा.पु.वि.	२२.	श्री.विनायक जाधव-ज्युनि.इंजिनियर वर्कशॉप,मिरज
२३.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी	२४.	श्री.जेलर – क्रिडा अधिकारी

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१ मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

प्रशासक मागील सभेतील कार्यवृत्त कायम करणेत येत आहे.

विषय क्र. ०२ मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०१/०९/२०२३ ते दि.०७/०९/२०२३, दि.०८/०९/२०२३ ते १४/०९/२०२३, आणि दि.१५/०९/२०२३ ते दि.२१/०९/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेणे.

प्रशासक आगीच्या घटनांची माहिती द्या.

अग्निशमन अधिकारी मोठ्या घटना नाहीत. किरकोळ आगीच्या घटना आहेत. कोणीही जखमी नाहीत.

प्रशासक दिवाळीच्या अनुषंगाने दक्षता घ्यावी. फटाके स्टॉलचे नियोजन करावे. विषय मंजूर

विषय क्र. ०३

सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, मध्ये कलानगर व पद्माळे रोड येथील रेल्वे क्रॉसिंगच्या कामास मुदतवाढ देणे व सदर दोन्ही ठिकाणी वाढीव काम चालू DSR नुसार करुन घेणेस व त्यास GST सह येणारे एकूण र.रु.७५,२१,३२४/- मात्रच्या खर्चास मान्यता देणे.

जलनि:सारण अभियंता

चार कामे मंजूर होती. पैकी दोन कामे पुर्ण झालेली आहेत व दोन कामे पाईप लाईन कामासाठी करता आली नव्हती. त्यास मुदतवाढ देणे व डबल रेल्वे लाईन झालेने, वाढीव कामास चालू DSR नुसार मान्यता देणेची आहे.

प्रशासक

विषय मंजूर

विषय क्र. ०४

महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ निलजी बामणी रोडवरील रस्ते हॉटमिक्स करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ सिद्धार्थ झोपडपट्टी बौद्ध वसाहत येथील रस्ते काँक्रिटी करणे व चेंबर करणे (४) मिरज वॉर्ड क्र.२० अ दिपक कडाळे यांच्या घरामागील रस्ता काँक्रिटीकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.६४,९९,७२६/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचेकडून त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.५३,२४,९८३/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे

प्रशासक

वाटाघाटीअंती मान्यता देणेत आलेली आहे. विषय मंजूर

विषय क्र. ०५

महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ खतिब हॉल समोरील इनामदार झोपडपट्टी येथे रस्ते काँक्रिटीकरण करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ त्रिभुवन सोसायटी येथील रस्ते हॉटमिक्स करणे (३) मिरज वॉर्ड क्र.२० अ ख्वॉजा वसाहत १०० फुटी ते रत्नागिरी हायवे हॉटमिक्स बी बी एम करणे अंदाजपत्रकीय र.रु.९४,९९,४७२/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचेकडून त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.७५,०९,३१५/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस ब त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे.

प्रशासक

वाटाघाटीअंती मान्यता देणेत आलेली आहे. विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- २३/१०/२०२३

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३७ **दिनांक :- २३/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०९/१०/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.३४ ते ठराव क्र.३६ हे वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३८ **दिनांक :-** २३/१०/२०२३

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.०५/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडील दि.०१/०९/२०२३ ते दि.०७/०९/२०२३, दि.०८/०९/२०२३ ते १४/०९/२०२३, आणि दि.१५/०९/२०२३ ते दि.२१/०९/२०२३ अखेरचे आगीचे विवरण पत्रे अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ३९ **दिनांक :- २३/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.१८/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली भुयारी गटार योजना टप्पा क्र.२, भाग-२, मध्ये सांगली येथील जुना कुपवाड रस्ता, कलानगर, पद्माळे रोड आणि तात्यासाहेब मळा (जासूद मळा) या चार ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग कामाचे मंजूर मक्तेदार श्रीराम ड्रिलिंग कंपनी,सांगोला यांनी जुना कुपवाड रस्ता व जासुद मळा ही दोन कामे पुर्ण केली असून, पैकी कलानगर व पद्माळे रोड येथील रेल्वे क्रॉसिंगच्या काम व्ही झोन मधील पाईप लाईनची कामे पुर्ण न झाल्याने, पुर्ण करता आलेली नव्हती त्यामुळे सदर दोन्ही कामास मुदतवाढ देणेस व सदर दोन्ही ठिकाणी नविन रेल्वे लाईन टाकणेचे काम झाल्यामुळे वाढीव काम करावे लागणार असुन, ते वाढीव काम चालू DSR नुसार करुन घेणेस व त्यास GST सह येणारे एकूण र.रु.७५,२१,३२४/- मात्रच्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

जलनि:सारण विभाग

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५० **दिनांक :- २३/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ निलजी बामणी रोडवरील रस्ते हॉटमिक्स करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ सिद्धार्थ झोपडपट्टी बौद्ध वसाहत येथील रस्ते काँक्रिटी करणे व चेंबर करणे (४) मिरज वॉर्ड क्र.२० अ दिपक कडाळे यांच्या घरामागील रस्ता काँक्रिटीकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.६४,९९,७२६/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचा निविदा दरापेक्षा ४.८९% जादा दराची निविदा प्राप्त झाली असून, वाटाघाटीअंती त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.५३,२४,९८३/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०४/२०२३-२४

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ४१ **दिनांक :- २३/१०/२०२३**

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/१०/२०२३ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील (१) मिरज वॉर्ड क्र.२० अ खतिब हॉल समोरील इनामदार झोपडपट्टी येथे रस्ते काँक्रिटीकरण करणे (२) मिरज वॉर्ड क्र.२० अ त्रिभुवन सोसायटी येथील रस्ते हॉटमिक्स करणे (३) मिरज वॉर्ड क्र.२० अ ख्वॉजा वसाहत १०० फुटी ते रत्नागिरी हायवे हॉटमिक्स बी बी एम करणे अंदाजपत्रकीय र.रु.९४,९९,४७२/- मात्रचे कामी विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक वीर कन्स्ट्रकशन,सांगली यांचा निविदा दरापेक्षा ४.९६% जादा दराची निविदा प्राप्त झाली असून, वाटाघाटीअंती त्यांनी सहमती दर्शविल्यानुसार निविदा र.रु.७५,०९,३१५/- मात्र निविदा दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका